**तथागताच्या वाटेवरती**



मित्रवर्य विजय मुडशिंगीकर यांनी बुध्दिस्ट सर्किटमध्ये भ्रमंती करून उत्तम छायाचित्रं काढली, पण त्याचं कॉफी टेबल बुक तयार करण्यासाठी त्याना कठीण काळातून जावं लागलं. आता त्यांचा हा प्रकल्प पूर्णत्वास गेला आहे. नुकतच त्याचं प्रकाशनही झालं. त्यांच्या प्रयत्नांना लाभलेलं यश पाहून उत्स्फुर्त सुचलेली कविता.

तथागताच्या वाटेवरती बुध्दाच्या देशा
पदस्पर्शाचे पावन दर्शन हीच एक आशा

तू धडपडला आणि  शिणला तरी वर उठला
वाहिला घाम, दिले ते दाम विश्रांती नाही मनाला

करी दर्शन सोपे सकल जनांना आता
तू दावीशी त्यांच्या निज नयनांना त्राता

सत्य शांतीचा धम्म खरा रे आता
दावील मार्ग तो अखिल जगाला पुरता

**नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/